



रयत शिक्षण संस्थेचे

# महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे.

नॅक 'अ' मानांकन / ISO ९००१:२०१५ प्रमाणित महाविद्यालय

सलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (*PU/PN/ACS/053*)

---

## ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३

महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे मध्ये सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन प्रवेश सुरु करण्यात आलेले आहेत.

### प्रवेशासाठी महत्त्वाच्या सूचना

- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षासाठी महाविद्यालयाचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत.
- सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले नवीन रजिस्ट्रेशन केल्यानंतरच ऑनलाइन लॉग-इन करून फॉर्म भरावा.
- ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी खालील कागदपत्रे आणि आपला पासपोर्ट साईज फोटो स्कॅन करून ठेवावा.
- ऑनलाइन प्रवेश अर्ज भरल्यानंतर सदर अर्ज महाविद्यालयात प्रवेश समितीस प्राप्त होईल. महाविद्यालयात प्रवेश समिती ऑनलाइन प्रवेश अर्जावर छाननी करून पेमेंट गेटवे साठी विद्यार्थ्यांना पेमेंट करण्यासाठी ऑप्शन देईल.
- विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चिती नंतर अर्जाची प्रिंट व फी भरल्याची पावती जवळ ठेवावी.
- ऑनलाइन प्रवेश अर्ज व प्रवेश फी भरल्यानंतर आपला प्रवेश निश्चित झाला असे नाही.
- महाविद्यालय नियमितपणे सुरू होईल तेव्हा सदर प्रवेश फी व पावती व ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी व त्यासोबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सत्यप्रतीसह महाविद्यालयात जमा करावेत.
- प्रवेश फॉर्म संबंधित कागदपत्रासह कार्यालयात जमा केल्यानंतरच आपला प्रवेश निश्चित केला जाईल. त्यानंतर आपणास अंतिम प्रवेश पावती आयडेंटी कार्ड व लायब्ररी कार्ड मिळेल.
- आवश्यक कागदपत्रे : शाळा सोडल्याचा दाखला, मागील परीक्षेचे गुणपत्रक, आधार कार्ड, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला (मागील वर्ष २०२१-२२), गॅप सर्टिफिकेट (असल्यास), बैंक पासबुक, आपला आधार क्रमांक बैंक खात्याशी लिंक असणे आवश्यक. वरील सर्व कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावेत.
  - ➢ बी.ए., बी. कॉम, बी.एस्सी. या वर्गात प्रथम येईल त्यास प्रथम प्रवेश या तत्त्वावर रिझर्वेशन नुसार दिला जाईल. एफ.वाय.बी.कॉम. वर्गाच्या अनुदानित तुकडीतील प्रवेश पूर्ण झाल्यानंतर विनाअनुदानित तुकडी मध्ये प्रवेश दिला जाईल.
  - ➢ ऑनलाइन प्रवेश अर्जासोबत सोबतच्या यादीनुसार क्रमाने कागदपत्रे जोडावीत / अपलोड करावीत. विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्याची फी परत मिळणार नाही.
  - ➢ प्रत्येकाने ऑनलाइन प्रवेश अर्जावर स्वतःचा अद्ययावत फोटो अपलोड करावा.
  - ➢ प्रवेशात संबंधित सूचना, कागदपत्रे यादी याबाबतचे स्वतंत्र नोटीस बेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल. प्रवेशासंदर्भात अडचणी आल्यास कार्यालयाशी अथवा प्रवेश कमिटी सदस्यांशी फोनवर संपर्क साधावा.

- दुबार (*Duplicate*) दाखल्यावर प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
- जे विद्यार्थी एप्रिल २०२०-२१ किंवा त्यापूर्वी शेवटची परीक्षा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांनी स्टॅम्प पेपरवर शैक्षणिक खंड प्रमाणपत्र (एज्युकेशनल गॅप सर्टिफिकेट) ओरिजनल जोडणे / अपलोड करणे आवश्यक आहे
- ऑनलाइन प्रवेश फॉर्म वर संबंधित विभागाच्या चेअरमन किंवा कमिटीतील सदस्यांनी मान्यता दिल्यानंतरच विद्यार्थ्यांनी फी भरण्यासाठी कार्यालयातील खिड़की पुढे रांगेत उभे राहून फी जमा करावी.
- ऑनलाइन प्रवेश अर्ज स्वीकारण्याचे वेळापत्रक स्वतंत्र नोटीस द्वारे लावले आहे. त्यानुसारच ऑनलाइन प्रवेश दिले जाईल.
- प्रवेशासाठी महाविद्यालयात जमा केलेले मूळ दाखले महाविद्यालयातून परत दिले जाणार नाहीत सर्व कागदपत्रांच्या आवश्यक तेवढ्या झेरॉक्स प्रती आपणाकडे काढून ठेवाव्यात.
- जोपर्यंत विद्यार्थ्यांचे ओरिजनल कागदपत्रे महाविद्यालयात जमा होत नाहीत तोपर्यंत विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्पुरता असेल. ओरिजनल कागदपत्रे महाविद्यालयात जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश नियमित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
- सीनियर कॉलेज मध्ये प्रवेश फॉर्म जमा करताना मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र किंवा जात पडताळणी प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र व जात पडताळणी नसलेल्या / अपलोड न केलेल्या विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी म्हणून ग्राह्य धरले जाईल. सदर विद्यार्थ्यांचा नंबर जात प्रमाणपत्र नसल्यामुळे विनाअनुदानित तुकडी मध्ये झाल्यास होणाऱ्या नुकसानीस संबंधित विद्यार्थिनी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.
- महाविद्यालयात प्रवेशासाठी / प्रवेशासंदर्भात चौकशी साठी येताना कोविड-१९ च्या सर्व सूचनांचे पालन करणे व मास्क वापरणे अनिवार्य आहे.

आदेशानुसार

प्र. प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे

प्रवेशासाठी लिंक : *https://mpcp.rayaterp.in/*